भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये Rs. 100

रु. 100 ONE HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2016 ◑ RN 993739

मैत्री हेल्थ केअर सेवाभावी संस्था मंचर

अध्यक्ष सचिव

1 - MAR 2018

॥ श्री ॥

:— करारनामा :—

करारनामा आज वार वार, तारीख माहे सन २० इसवी ते दिवशी ...

| | |
|---|---|
| मैत्री हेल्थकेअर सेवाभावी संस्था,<br>नोंदणी रजि.नं. महा १०९/२०१८ पुणे<br>मुख्य कार्यालय — मंचर,<br>ता. आंबेगाव, जि. पुणे.<br>शाखा ---<br>तर्फे अध्यक्ष ---<br>श्री बाळासाहेब धोंडिभाऊ पोखरकर,<br>उ.वय ३४ वर्षे, धंदा -- व्यवसाय,<br>रा. पिंपळगांव खडकी, ता. आंबेगाव,<br>जि. पुणे. | लिहून घेणार |

यांसी ...

हॉस्पीटल नाव —
डॉक्टर श्री गणेश शिवाजी आमले
पदवी — ∟
उ.वय 35 वर्षे, धंदा — वैद्यकिय व्यवसाय,
मोबाईल क्रमांक — 9096296119
पत्ता — नारायणगाव ता. जुन्नर जि. पुणे

**याकामी करारनामा लिहून देतो की,**

करारनामा लिहून घेणार 'मैत्री हेल्थकेअर सेवाभावी संस्था' ही सामाजिक उपक्रम राबविणारी संस्था नव्याने उदयास आलेली आहे. सदर संस्थेचे प्रमुख उद्दीष्ट हे केवळ सामाजिक उपक्रम राबविणे आणि त्यातून सर्वसामान्य नागरिकांना आवश्यक असलेल्या वैद्यकिय गरजांची सवलतीच्या दरात सर्वोतोपरी पूर्तता करणे हे आहे. त्याचबरोबर सदर संस्थेच्या माध्यमातून गरजू व गोरगरीब नागरिकांना रोजगाराच्या संधी निर्माण करणे, समाजाच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या समाजोपयोगी गरजांची शक्य तितक्या चांगल्या पध्द्तीने व दर्जात्मक स्वरूपात पूर्तता करण्याचे कार्य सदर संस्थेच्या माध्यमातून करावयाचे सदर संस्थेचे मूळ उद्दीष्ट आहे. सामाजिक बांधिलकीचे भावनेतून संस्थेचे अध्यक्ष श्री बाळासाहेब धोंडिभाऊ पोखरकर यांनी सदर 'मैत्री हेल्थकेअर सेवाभावी संस्थे'ची सुरूवात केली आहे.

सदर सेवाभावी संस्था ही संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये मान्यताप्राप्त संस्था आहे. सदर संस्थेचा परवाना संस्थांचे सहाय्यक निबंधक यांचेमार्फत सदरचे सेवाभावी संस्थेस प्राप्त झाला आहे.

सदर सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून वेगवेगळया ठिकाणच्या दवाखाना/हॉस्पीटल यांना जोडण्याचा व त्यांचेमार्फत रूग्णांना सवलतीच्या दरात उपचारांची सुविधा देण्याचा विशेष प्रयत्न सदर संस्थेच्या माध्यमातून करणेचा संस्थेचा मानस आहे. त्या दृष्टीने विशेषत: आंबेगाव, खेड आणि जुन्नर या तालुक्यांबरोबरच संपूर्ण महाराष्ट्र राज्याचे मर्यादेपर्यंत सदर संस्थेचे कार्यक्षेत्र राहणार आहे.

सदर संस्थेच्या माध्यमातून समाजातील कुटूंबांना सभासद करण्यात येणार आहे. संस्थेच्या कार्यप्रणालीकरिता सभासदत्वाचे देयक/निधी हा कुटूंबातील व्यक्तीपरत्वे आकारण्यात येणार आहे. सदर निधीचा / देयकाचा लाभ हा सदर सभासदत्व मिळणा—या कुटूंबातील वैद्यकिय उपचारांची आवश्यकता असलेल्या सदस्यास मिळणार आहे.

१) मैत्री हेल्थ केअर सेवाभावी संस्थेच्या सुविधेसाठी वैद्यकीय हॉस्पिटल /डॉक्टर डायग्नोस्टिक सेंटर/क्लीनीकल पॅथोलॉजी लॅब /रूग्णवाहिका सेवा आणि मैत्री हेल्थ केअर सेवा भावी संस्था यांचा ३ वर्षाचा लेखी स्वरूपात करार आहे.

२) मैत्री हेल्थ केअर सेवाभावी संस्थेच्या येणाऱ्या सभासदाला रूग्णांला आपल्या उपलब्ध सुविधेनुसार मी स्वतः रूग्णवाहिका सेवा/क्लीनीकल पॅथोलॉजी लॅब सुविधा/ डायग्नोस्टिक सेंटर व इतर सवलतीमध्ये एकुण बीलावर आरोग्य सुविधा सवलत म्हणुन २० टक्के सवलत देण्यास तयार आहे.तसेच माझ्याकडे असणाऱ्या सुविधेमध्ये संस्थेच्या नियम व अटीनुसार मी चर्चा करून लेखी स्वरूपात हेल्थ चेकअप सवलतीचे पॅकेज गोरगरीबांसाठी व सर्वसामान्य लोकांसाठी त्यास माझी तयारी आहे.सदरचे पेपरपाठीमागे जोडले आहे.

३) मैत्री हेल्थ केअर सेवाभावी संस्थेच्या माध्यमांतुन ऑनलाईन , ऑफलाईन आरोग्य सुविधा घेण्यासाठी फॅमिली सभासद आल्यास त्याची पुर्वकल्पना एस.एम.एस.अथवा कॉल करून दिली जाईल.

४) मैत्री हेल्थ केअर सेवाभावी संस्था व वैद्यकीय हॉस्पिटल डॉक्टर डायग्नोस्टिक सेंटर , क्लीनीकल पॅथोलॉजी लॅब /रूग्णवाहिका सेवा /यांनी ऐकमेकांशी एका विचाराने राहणे बंधनकारक राहतील. ऐकमेकांची चुकीची माहिती संस्था व /स्वतः हॉस्पिटल यांनी दिल्यास संस्था किंवा आम्ही जबाबदार राहु. इतर कोणीही चुकीची माहिती अथवा अफवा कोणत्याही माध्यमातुन पसरविल्यास किंवा पसरल्यास त्यावर संस्थेने किंवा आम्ही विश्वास ठेवणार नाही. त्याकरीता संस्था व आम्ही ऐकमेकांशी एकनिष्ठ राहणे दोघांचेही हितावह आहे.

५) मी स्वतः व मैत्री हेल्थ केअर सेवाभावी संस्था यांच्याशी झालेल्या वैयक्तीक चर्चा पुर्वकल्पना नियम व अटी या आमच्या वैयक्तीक पातळीवरती राहतील.

६) मैत्री हेल्थ केअर सेवाभावी संस्था यांच्या माध्यमातुन आरोग्य सुविधा घेण्यासाठी सभासद अथवा रूग्ण मेडीक्लेम अथवा कोणत्याही इन्शुरन्स कंपनीचा अथवा इतर कोणत्याही डॉक्टरांचा रेफर असल्यास संस्थेचा संस्थेच्या सभासद/रूग्णास आम्ही संस्थेच्या नियमानुसार सवलत देण्यास तयार आहोत.

७) वैद्यकीय सेवेतुन जनसेवा हिच ईश्वरसेवा असे मानुन आपण सर्वांनी चांगले उत्कृष्ठ व दर्जात्मक कार्य करणेस गरजुंना आवश्यक असलेली सुविधा पुरविणे व इतर मदत करण्यास सदैव तत्पर असणे आवश्यक आहे.

वर करारनाम्यामध्ये नमुद केलेला संपुर्ण मजकुर आम्ही लिहुन देणार आणि लिहुन घेणार यांनी वाचुन समजुन, उमजुन त्यावर राजीखुशीने स्वाक्षरी केली आहे.

माहितीपत्रक जोडले आहे.

वरील माहिती चुकीची आढळून असल्याचे भारतीय दंड संहिता कलम १९३, १९९/२ व २०० अन्वये कायदेशीर कारवाईस पात्र राहील.

आढळून आल्यास मी लिहुन घेणार

मैत्री हेल्थ केअर सेवाभावी संस्था मंचर
रजि.नं. महा/१०९/२०१८ /पुणे.

मैत्री हेल्थ केअर सेवाभावी संस्था
अध्यक्ष

लिहुन देणार
नाव — गणेश शिवाजी आमले